ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80. Licence No. 175

वर्ष ३७ | पुणे, बुधवार, २१ एप्रिल, १९७१ | अंक ८


## ठाकरसी कापडाने फॅशनची रंगत वाढते !




पुढचं पाऊल काय टाकावं हे कळेनासं होतं तेंव्हा—प्रथम ठाकरसी कापड वापरा. मग कोणत्याहि कामासाठी आवश्यक सळसळतं चैतन्य, उल्हसित करणारा उत्साह आणि तरतरी वाटू लागेल! फॅशनच्या क्षेत्रांत आघाडीवर राहण्यासाठीं खुशाल पाऊल टाका नि ठाकरसीचं कापड घ्या. **एव्हरफ्रेश** (६७% 'टेरीन' ३३% कॉटन) साड्या, फ्रॉकचे कापड, शर्टिंग्ज आणि सूटिंग्ज, स्क्रीन प्रिंट्स, २×२ पॉप्लिन, रंगीत/प्रिंटेड् कॅम्ब्रिक्स, वॉयल्स, डॉबीज्, जेकार्डस्, आणि अनेक प्रकारचे कापड.

दि हिंदुस्थान स्पिनिंग ॲण्ड वीव्हिंग मिल्स लि., १६, अपोलो स्ट्रीट, मुंबई-१

## अविकसित देशांच्या दारिद्र्याची मीमांसा

पश्चिम युरोप, अमेरिका, जपान, इत्यादी प्रगत देश आणि आशिया-आफ्रिका खंडातील अविकसित देश ह्यांमधील लोकांच्या जीवनमानात खूपच तफावत आहे. विकसित झालेल्या देशांनी विकसनशील देशांना आर्थिक मदत करण्याच्या कामी जितका पुढाकार घ्यावयास पाहिजे तितका घेतलेला नाही. त्यामुळे ह्या दोन गटांतील देशांतील दारिद्र्याची दरी अधिकच रुंदावत चालली आहे. ह्याचा अर्थ विकसित व पुढारलेले देश मागासलेल्या देशांना बुद्धयाच मदत करीत नाहीत असा नाही. पुढारलेल्या देशांनाही त्यांच्या अंतर्गत समस्यांची उकल करावयाची असते. कधी कधी त्यांच्यातील आंतरराष्ट्रीय स्पर्धाही मदतीच्या आड येते. असे असले तरी ह्या बाबतींत विकसनशील देशांचीही काही जबाबदारी आहे. ती पार पाडण्याची कोशीस त्यांच्याकडून व्हावी तशी होत नाही. आर्थिक प्रगतीसाठी राजकीय स्थैर्याची आवश्यकता असते. पण आशियात अगर आफ्रिकेत गेल्या काही वर्षात ज्या राजकीय घडामोडी झाल्या अगर होत आहेत त्यांचा विचार करता मदत देणाऱ्या देशांनाही फारसा बोल लावता येणार नाही. अलीकडे पूर्व-पाकिस्तानांत जपानी उद्योगधंद्यांचे काही प्रतिनिधी आले होते. तेथे होऊ शकणाऱ्या औद्योगिक सहकार्याची शक्यता ते अजमावणार होते. परंतु तेथील अस्थिर राजकीय वातावरण पाहून त्यांनी आपला पाय काढता घेतला. ह्याचा अर्थ असा की दैनंदिन राज्यकारभार कार्यक्षमतेने चालवून स्वतःचा आर्थिक उद्धार घडवून आणण्याची बुद्धी अगर कुवत आशियातील देशांत पाहिजे तितक्या प्रमाणात आढळून येत नाही. त्याचा परिणाम परदेशांकडून होऊ शकणाऱ्या मदतीवर न झाला तरच नवल.

विकनशील देशातील राजकीय अस्वस्थतेची आर्थिक मीमांसा मि गुन्नार मृडल ह्या स्वीडनच्या अर्थशास्त्रज्ञाने व समाजशास्त्रज्ञाने केली आहे. ते म्हणतात की बहुतेक विकसनशील देशांच्या शेतीच्या व्यवसायात आर्थिक आणि सामाजिक विषमता दृढमूल झालेली आहे. ही विषमता अधिक वेगाने वाढत जाण्याचीच चिन्हे दिसून येत आहेत. बहुतेक देशांनी जमीनधारणेच्या पद्धतीत सुधारणा करण्याचे प्रयत्न केले. परंतु आता ह्या सुधारणा करण्याची तळमळ ओहोटीला लागली आहे. शेतीतील उत्पादन वाढविण्याचा प्रश्न हरित क्रांतीच्या साह्याने सुटत आहे अगर सुटलाही आहे असा समज पसरत चालला आहे. त्याशिवाय विकसन देशातील शेतीच्या व्यवसायात मनुष्य बळाचा जास्तीत जास्त वापर करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. कारण औद्योगीकरणाचा वेग वाढवून लोकांना कामधंदा पुरविता येईल अशी जी कल्पना होती ती व्हावी तितकी फलदायी झालेली नाही शिवाय मागासलेल्या देशातील कामगार हा अर्ध वेळ आणि तोही अकार्यक्षमतेने काम करतो. विकसनशील देशातील राजकीय पक्ष जमीन धारणेच्या पद्धतीत सुधारणा करण्याच्या प्रश्नाला अग्रहक्क देतात. ह्या सुधारणेच्या साह्याने सामाजिक बदल घडवून आणण्याचा त्यांचा मानस असतो. परंतु बहुतेक देशातून जमीन धारणेच्या सध्याच्या पद्धतीत बदल करण्यात आलेला नाही आणि जेथे करण्यात आला आहे तेथे तो अत्यंत असमाधानकारक रीतीने करण्यात आलेला आहे. म्हणून अशा देशांनी आपल्या आर्थिक व सामाजिक व्यवसायात फार मोठे क्रांतिकारक बदल घडवून आणण्याची तयारी दाखविली पाहिजे. अशा बदलाच्या कार्यक्रमात जमीनधारणेच्या पद्धतीतील सर्वंकष सुधारणेला पहिले स्थान दिले गेले पाहिजे.

---

## इ. स. २,००० च्या आर्थिक भाकिताची रूपरेखा

इ. स. २,००० हे साल उजाडण्यास आता तसा फार मोठा अवधी नाही. ३० वर्षांनी उजाडणाऱ्या ह्या वर्षाच्या सुमारास जगातील देशांची आर्थिक अवस्था काय असेल ह्यासंबंधी स्वित्झरलंडमधील एका नियतकालिकाने काही अंदाज व्यक्त केले आहेत. त्या वेळच्या जगाच्या आर्थिक अवस्थेचे भाकितच वर्तविण्यात आले आहे. लोकसंख्येच्या वाढीचा व राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीचा सध्याचा वेग जमेस धरून असा अंदाज करण्यात आला आहे की, इ. स. २,००० च्या सुमारास जगातील ५० महत्त्वाच्या देशांच्या यादीत भारताचा अनुक्रम लोकसंख्येच्या दृष्टीने दुसरा लागेल. भारताची लोकसंख्या त्या सुमारास ९२ कोटींपर्यंत वाढलेली असेल. पण, ठोक राष्ट्रीय उत्पन्नाच्या दृष्टीने मात्र भारताचा अनुक्रम ९ वा लागेल. चीनची लोकसंख्या १०३ कोटींच्या घरात असेल आणि राष्ट्रीय उत्पनाच्या बाबतीत त्याचा क्रम ६ वा लागेल. त्यानंतर ब्रिटनचा अनुक्रम लागेल. दहा वर्षांपूर्वी ब्रिटनला मागे टाकण्याचे उद्दिष्ट चीनने ठेवले होते. त्या वेळी चीन या बाबतीत जपानच्या पुढे होता. परंतु नंतर जपानने जोराने प्रगती करून सध्या ३ रा क्रमांक पटकावला आहे. इ. स. २,००० च्या सुमारास भारत राष्ट्रीय उत्पन्नाच्या बाबतीत कॅनडाला मागे टाकील. पण कॅनडाची अल्प लोकसंख्या लक्षात घेता ह्यात काही विशेष आहे असे म्हणता येणार नाही. राष्ट्रीय उत्पन्नाच्या बाबतीत अमेरिकेचा अनुक्रम केव्हाही पहिलाच लागेल. अमेरिकेनंतर रशिआ, जपान आणि पश्चिम जर्मनी ह्यांचे नंबर लागतील. तथापि दरडोई उत्पन्नाचा विचार केला तर अमेरिकेनंतर स्वीडन व डेन्मार्क ह्यांचा क्रम लागेल. ह्यादृष्टीने विचार करता भारत व चीन ह्यांच्या जागा तळाकडेच असतील.

भारत अगर चीनसारख्या मोठ्या देशांच्या आर्थिक वाढीचा व लोकसंख्येच्या वाढीचा वेग असा कायमचा राहील असे मानण्याचे कारण नाही. दोन्हीही देशांत लोकसंख्येच्या वाढीला आवर घालण्याचे प्रयत्न नेटाने करण्यात येत आहेत. ह्या प्रयत्नांना येत्या १० वर्षात जरी यश आले तरी त्यांचे दरडोई उत्पन्न वाढण्यास प्रारंभ होईल ह्यात शंका घेण्याचे कारण नाही.

☆ अर्थ ☆

बुधवार, २१ एप्रिल, १९७१



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## परदेशांबरोबरच्या औद्योगिक सहकार्यावरील निर्बंध

औद्योगिक दृष्ट्या मागासलेल्या देशांना आपला विकास करून घेण्यासाठी प्रगत देशांच्या तंत्रज्ञानाची आवश्यकता असते. हे ज्ञान पुरविण्यासाठी परदेशांतील उद्योगपती तयार असले तरी सर्व मदार त्यांच्या सहकार्यावर टाकणे इष्ट नसते. म्हणून भारत सरकारने अशा प्रकारच्या सहकार्यावर काही निर्बंध घातले आहेत. ह्या निर्बंधांविषयी प्रसिद्ध उद्योगपती डॉ. भरत राम ह्यांनी नाराजी दर्शविली आहे. डॉ. भरत राम हे इंटरनॅशनल चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष आहेत. इंडिअन् स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूट ह्या संघटनेतर्फे मालाचा दर्जा उच्च राखण्यासंबंधीची ५ वी अखिल भारतीय परिषद दिल्ली येथे भरविण्यात आली होती. तीन दिवसांपर्यंत चाललेल्या ह्या परिषदेसाठी उद्योगधंद्यांचे व सरकारचे मिळून सुमारे ८०० प्रतिनिधी आले होते. परिषदेचे उद्‌घाटन करताना डॉ. भरत राम म्हणाले की, परदेशांशी औद्योगिक सहकार्य करण्याच्या बाबतीत सरकारने जे निर्बंध जारी केले आहेत त्यामुळे सहकार्यावर आधारलेल्या हिंदी उद्योगधंद्यांची परदेशी बाजारपेठेतील स्पर्धेची शक्ती वाढीस लागण्यास अडथळे उत्पन्न होत आहेत. ज्या उद्योगधंद्यांत अजून पूर्णपणे अद्ययावत तंत्रज्ञान वापरले जात नाही त्या धंद्यांच्या बाबतीत ही भीती विशेषच खरी ठरण्याची शक्यता आहे. कारखान्यांतून तयार होणाऱ्या मालाचा दर्जा राखण्यासाठी काही पथ्ये पाळावयास पाहिजेत ह्याबद्दल वाद असण्याचे कारण नाही. तरीसुद्धा अजूनही भारतामधील मोठाले उद्योगधंदेही ह्या बाबींकडे द्यावे तितके लक्ष सातत्याने देत असल्याचे दिसत नाही.

त्याचबरोबर परदेशांशी करावयाच्या सहकार्यावर फार बंधने लादण्याचा परिणाम चांगला होणार नाही, हेही लक्षात ठेवले पाहिजे. परदेशांकडून तंत्रज्ञानाची माहिती मिळविताना आपल्या परदेशीय चलनाच्या साठ्यावर ताण पडतो ह्यात शंका नाही. तात्पुरत्या फायद्याच्या दृष्टीने असा ताण एकसारखा पडणे इष्ट नाही हे खरे. पण विचाराची ही बाजू अदूरदृष्टीची म्हणावी लागेल. कारण उद्योगधंद्यांतील अद्ययावत उत्पादनतंत्र हस्तगत करण्यासाठी द्यावी लागणारी किंमत आज मोठी वाटली तरी दीर्घकालीन परिणामाच्या दृष्टीने ती तशी वाटणार नाही. परदेशांतील उत्पादनाचे तंत्र प्रगतिमान आहे. त्याच्याशी तुलना करता भारतामधील उत्पादनतंत्र अद्याप मागासलेले आहे. ते परदेशांच्या जवळपास आणावयाचे थांबविल्यास काही वर्षांनी भारतामधील उद्योगधंदे इतके जुनाट होतील की त्यांची किंमत केवळ मोड म्हणूनच काय राहील ती राहील. अर्थात, अशा अवस्थेत परदेशांतील बाजारपेठांत स्पर्धा करण्याचे त्याचे सामर्थ्य शून्यापर्यंत खाली आलेले असेल. म्हणून ह्या बाबतीत सरकारने अधिक लवचिक आणि परिस्थितीसापेक्ष धोरण ठेवण्याची आवश्यकता आहे. देशांतील साधनसंपत्तीचा अधिकात अधिक उपयोग करण्यात यावा म्हणुन आयातीचे परवाने देण्याचे धोरण विशिष्ट पद्धतीने हाताळण्यात येत आहे. परंतु ह्याही बाबतीत सावधानता बाळगणे जरूर आहे. देशांतील साधनसंपत्ती वापरताना ती काही किमान दर्जाच्या खाली असणार नाही ह्याची दक्षता घ्यावयास हवी. नाही तर तयार होणाऱ्या मालाचा दर्जा घसरून बाजारपेठेत त्याची नाचक्की होण्याची भीती आहे.

## काळ्या पैशासंबंधी तात्पुरता अहवाल

अर्थव्यवस्थेत माजलेला काळा पैसा धुमाकूळ घालीत आहे अशी तक्रार जाणकार आणि त्यांच्या पावलावर पाऊल ठेऊन सामान्य नागरीकही करीत असतात. ह्या गूढ प्रश्नाची उकल करण्यासाठी काहीतरी उपाय योजण्यात यावे अशी भावना सर्वत्र दिसून येते. तिला अनुसरून गेल्या वर्षीच्या फेब्रुवारी महिन्यात सुप्रीम कोर्टाचे माजी मुख्य न्यायाधीश श्री. वांच्छू ह्यांच्या अध्यक्षतेखाली एक चौकशी कमिटी नेमण्यात आली होती. अर्थव्यवस्थेत बिनहिशेबी गुपचुप वावरणाऱ्या छुप्या पैशासंबंधी कमिटीने माहिती जमवावी व उपाय सुचवावे अशी अपेक्षा आहे. ह्या कमिटीचे अधिकृत नाव प्रत्यक्ष कर चौकशी कमिटी असे असून पुढील महिन्याच्या प्रारंभी ती आपला तात्पुरता अहवाल सरकारला सादर करण्याची शक्यता आहे. पुढील महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात लोकसभेत भारत-सरकार नव्या वर्षाचे अंदाजपत्रक सादर करणार आहे. तत्पूर्वी कमिटीचा अहवाल हाती येईल असा अंदाज आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेत काळा पैसा किती वावरत असावा ह्याविषयी अनेक अंदाज आहेत. पण अगदी कमीत कमी ३,००० कोटी ते ३,५०० कोटी रुपये काळा पैसा असावा असा तर्क आहे. इतक्या मोठ्या रकमेची नाणे बाजारावर व पर्यायाने किमतीवर दाब पडणे अपरिहार्यच म्हटले पाहिजे. तेव्हा हा छुपा पैसा उघड्यावर कसा आणावा आणि त्याची नव्याने वीण कशी थांबवावी ह्याविषयी कमिटी काही शिफारशी करील असा संभव

आहे. भारतीय रुपयांचे आणखी अवमूल्यन करण्यात येईल ही शक्यता अधिकारी नाकारीत आहेत. १९६६ सालच्या जून महिन्यात रुपयाचे अवमूल्यन करण्यात आलेले आहे.

तथापि रुपयाच्या अवमूल्यनाच्या अफवा पुन्हा पुन्हा पसरत आहेत. त्या काही हितसंबंधीयांकडून पसरविण्यात येत असल्याची शक्यता आहे. ग्रामीण भागांतील बेकारी कमी करण्यासाठी ५० कोटी रुपायांची योजना आखण्यात आली आहे. ती कार्यवाहीत आणण्यास प्रारंभ झाल्यावर खेडोपाडी चलनवृद्धीची भीती राहाणार नाही अशी अपेक्षा करण्यात येत आहे. कारण बेकारी निवारणाची नवी योजना ही केवळ रोजगारी पुरविण्याची नसून तिची सांगड उत्पादनाशी घालण्यात आलेली आहे. उत्पादन स्थगित राहून अगर कमी होऊन नुसतेच पैशाचे वितरण झाले तर चलनवृद्धीचा धोका उत्पन्न होतो आणि असलेला वाढीस लागतो. परंतु बेकारी निवारणाच्या सकल्पित योजनेमुळे खेडोपाडी जो पैसा लोकांच्या हाती जाईल त्यामुळे चलनवृद्धी व वाढत्या किमती ह्यांचे भय राहाणार नाही. अर्थमंत्री श्री. चव्हाण ह्यांनी तात्पुरते अंदाजपत्रक लोकसभेत मांडताना वेतन आणि उत्पन्न ह्यांसंबंधी नव्या धोरणाचा उल्लेख केला होता. नव्या धोरणाचा तपशील जाहीर झालेला नसला तरी त्यात वेतन गोठविण्याचा अंतर्भाव असावा अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे तथापि वेतनात होणारी वाढही उत्पनाशी निगडित असल्यामुळे तिचा परिणाम किमती वाढण्यात होऊन किमती व वेतन ह्यांची शर्यत सुरू होईल अशी भीती अधिकारी गोटांना वाटत नाही. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाचा खर्च १,१९५ कोटींपेक्षाही काहीसा अधिक होणार आहे. अशा स्थितीत मूळची २४० कोटी रुपयांची अपेक्षित तूट त्याहीपेक्षा अधिक येईल असे दिसते. म्हणजेच अर्थमंत्र्यांना कराचा बोजा बराच वाढवावा लागणार अशी चिन्हे दिसतात.

---

## आधुनिक शेतीचे युरोपमधील चित्र

हिंदमधील शेतीच्या व्यवसायात सुधारणा घडवून आणल्यानंतर येथे हरितक्रांतीचा अवतार झाल्याचे सांगण्यात येते. पण त्याच बरोबर ह्या आधुनिक शेतीचा फायदा फक्त काही थोड्या प्रगत शेतकऱ्यांनाच झाला. छोटा शेतकरी अद्याप तसाच राहिला आहे, अशी टीका करण्यात येते. महाराष्ट्रातील सधन बागाईतदारच काय ते हरितक्रांतीचा फायदा घेऊ शकले आहेत. पण ही घटना केवळ भारतासारख्या अविकसित देशातच होत आहे असे नव्हे. पश्चिम युरोपमधील युरोपिअन इकॉनामिक कम्युनिटीत सामील असलेल्या देशातही आधुनिक उत्पादन तंत्राचा वापर करून सधन झालेला एक नवा वर्ग उदयास आला आहे. इतर शेतकऱ्यांना सरकारी मदतीच्या कुबड्याशिवाय शेती करणे अवघड जात आहे. त्यांचा माल ठराविक दराने विकत घेण्याचे धोरण अवलंबावे लागत आहे.

---

## चलनामधील नोटांचे व नाण्यांचे प्रमाण

भारतात चलनामध्ये असलेल्या नोटांचे आणि नाण्यांचे प्रमाण खालील तक्त्यात दर्शविले आहे. त्यावरून दिसून येईल की ५ रु. च्या नोटांचे प्रमाण १९३९ मध्ये १८·३ % होते ते १९७० मध्ये ७ % वर उतरले आहे. १० रु. च्या नोटांचे प्रमाण १९३९ मध्ये ३९·३ % होते, ते १९६५ मध्ये ४२·७ % होऊन १९७० मध्ये ३४·४ % वर आले आहे. १०० रु. च्या नोटांचे प्रमाण वाढत चालले आहे. ३०·२ % चे ते ४६·६ % झाले आहे.

### एकूण चलनातील नोटांचे व नाण्यांचे प्रमाण

| | | १९३९ | १९५६ | १९७० |
|---|---|---|---|---|
| लहान नाणी | ... | ०·१ | ३·९ | ३·० |
| रुपये व रु. च्या नोटा | ... | ६·५ | ८·१ | ५·८ |
| २ रु. च्या नोटा | ... | — | १·९ | ५·८ |
| ५ रु. च्या नोटा | ... | १८·३ | १०·५ | ७·० |
| १० रु. च्या नोटा | ... | ३९·३ | ३६·२ | ३४·४ |
| १०० रु. च्या नोटा | ... | ३०·२ | ३५·१ | ४६·६ |
| १,००० रु. च्या नोटा | ... | ५·५ | ३·३ | १·२ |
| ५,००० रु. च्या नोटा | ... | — | ०·६ | ०·३ |
| १०,००० रु. च्या नोटा | ... | — | ०·४ | ०·१ |
| | ... | १००·०० | १००·०० | १००·०० |

आपण अशी कल्पना करू या की एकूण १,००,००,००० रुपयांचे चलन प्रसारात आहे. मग त्या चलनात वेगवेगळी नाणी आणि नोटा किती रुपयांच्या असतील ?

| | | |
|---|---|---|
| लहान नाणी | रु. | ३,००,००० |
| रुपये व रुपयाच्या नोटा | रु. | ५,८०,००० |
| २ रु. वाल्या नोटा | रु. | १,५०,००० |
| ५ रु. वाल्या नोटा | रु. | ७,००,००० |
| १० रु. वाल्या नोटा | रु. | ३४,४०,००० |
| १०० रु. वाल्या नोटा | रु. | ४६,६०,००० |
| १,००० रु. वाल्या नोटा | रु. | १,२०,००० |
| ५,००० रु. वाल्या नोटा | रु. | ३०,००० |
| १०,००० रु. वाल्या नोटा | रु. | १०,००० |
| | रु. | १०,००,००,००० |

एक कोटी रुपयांचे चलन प्रसारात असेल तर त्यात सरासरीने १०,००० रु. ची एक नोट असेल, ५,००० रु. च्या ६ नोटा असतील, १,००० रु. १२ नोटा असतील, १०० रु. वाल्या ४६,६०० नोटा असतील, १० रु. वाल्या ३,४४,००० नोटा असतील आणि ५ रु. वाल्या १,४०,००० नोटा असतील आणि २ रु. वाल्या ७५,००० नोटा असतील.

## बड्या देशांचा शस्त्रास्त्रांचा व्यापार

जगातील सर्व बडे देश त्यांच्याजवळील शस्त्रास्त्रांची विक्री इतर देशांना करीत असतात. पुष्कळदा ही शस्त्रास्त्रे त्यांच्याजवळच्या शिलकी साठ्यातील असतात. म्हणजेच ती अद्ययावत नसतात. पण अप्रगत देशांना तीही अत्याधुनिक वाटतात. कारण, त्यांना स्वतःला तीही करता येत नाहीत. शस्त्रास्त्रांच्या ह्या व्यापारात अमेरिकेचे स्थान अर्थातच प्रथम क्रमांकाचे आहे. माद्रीदमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या एका वृत्तपत्राने गेल्या सोळा वर्षात अमेरिकेने परदेशांना दिलेल्या शस्त्रास्त्रांचे अंदाजी आकडे प्रसिद्ध केले आहेत. ह्या शस्त्रसामग्रीची किंमत ३,२०० कोटी डॉलर्स होईल. त्यांच्या किमतीवरून शस्त्रास्त्रांच्या व्यापाराची कल्पना आली तरी शस्त्रास्त्रांच्या संख्येची कल्पना येत नाही. वृत्तपत्राने शस्त्रास्त्रांचे दिलेले आकडे असे आहेत. १५,६४० विमाने, २,५०० बोटी, १९,८२७ रणगाडे, २१ लाख ५२ हजारांवर बंदुकी, ७१ हजार १७४ मशिनगन्स आणि ३० हजार ६६८ उखळी तोफा. इतकी प्रचंड संख्येची शस्त्रास्त्रे अमेरिकेने इतर देशांना विकली, कर्जाऊ दिली अगर सरळ देणगी म्हणून दिली. हा व्यापार करण्याचे कारण असे सांगण्यात येते की जगातील सामुदायिक शांततेचे रक्षण करण्यासाठी आणि अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याच्या व्यवहारात समतोल साधण्यासाठी त्याची आवश्यकता आहे. पण हे धोरण विसंगत दिसते. पुष्कळदा त्यामागील हेतू भलतीकडेच राहतो. उदाहरणार्थ, दिलेली शस्त्रे भलत्याच कामी वापरली जातात. चीनविरुद्ध वापरण्यासाठी दिलेली शस्त्रे पाकिस्तानने १९६५ मधील युद्धात भारताविरुद्ध वापरली. इतरत्रही असाच अनुभव आहे.

---

## राहणीचा खर्च रोखण्याची आवश्यकता

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आशिया व अतिपूर्व आर्थिक मंडळाने ह्या भूभागातील देशांच्या सध्याच्या आर्थिक अवस्थेविषयी एक पाहणी केली असून परिस्थिती सुधारण्यासाठी काही सूचनाही केल्या आहेत. ह्या भागातील लोकांचे राहणीचे मान सुधारण्यासाठी आर्थिक उत्पादनात वाढ करून भागणार नाही. तर उत्पादनाच्या वाढीबरोबरच सामाजिक न्यायाकडेही लक्ष देण्यात आले पाहिजे असा अभिप्राय पाहाणीत व्यक्त करण्यात आला आहे. भारत आणि इतर देश ह्यांना असा सल्ला देण्यात आला आहे की त्यांनी आपल्या द्रव्यविषयक धोरणात उत्पादनाच्या वितरणाच्या पद्धतीकडेही लक्ष दिले पाहिजे. १९७० मध्ये सुरू झालेल्या दशकात उत्पादनाच्या फेरवाटणीच्या प्रश्नाला मोठे महत्त्व प्राप्त झालेले असून त्याची सोडवणूक करण्यासाठी मुद्दाम हेतुपूर्वक धोरण आखण्यात आले पाहिजे. समाजातील सर्व थरांतील लोकांना आपली प्रगती करून घेण्यासाठी त्वरित संधी उपलब्ध करून देण्यात आल्या पाहिजेत. त्यासाठी जरूर तर सामाजिक संस्थांच्या प्रेरणात बदल घडवून आणला पाहिजे. आर्थिक विकास आणि सामाजिक न्याय ह्यांची सांगड घालण्यासाठी लोकसंख्येच्या वाढीचा वेग कमी करण्यात आला पाहिजे। जमीनधारणा पद्धतीतील विषमता दूर करण्यात आली पाहिजे त्याचबरोबर राहणीच्या खर्चाचे मान स्थिर राखण्याचे प्रयत्न करण्यात आले पाहिजेत. नाहीतर चलनवृद्धीच्या दाबात फार मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. असा दाब निर्माण झाला तर उत्पन्नाच्या सध्याच्या वाटणीतील विषमता कमी करण्याचे प्रयत्न व्यर्थ ठरून उलट ती आणखीच वाढत जाईल. ह्या उपायांबरोबरच रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करून देण्यात आल्या पाहिजेत.

---

## शास्त्रीय संशोधनात भारत मागासलेला का ?

पदार्थविज्ञानाचे राष्ट्रीय प्राध्यापक श्री. एस्. एन्. बोस ह्यांनी दिल्ली येथे बोलताना भारतामधील शास्त्रीय संशोधनाच्या सद्यःस्थितीबद्दल काही परखड विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणतात की भारतात अनेक अद्ययावत प्रयोगशाळा स्थापन करण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर सी. व्ही. रामन् ह्यांच्यासारख्या प्रख्यात शास्त्रज्ञांनी संशोधनाचा पायंडाही पाडला होता. तरीही भारत ह्या बाबतीत मागासलेला आहे. संशोधनाच्या बाबतीत जपानसारखे देशही भारताच्या पुढे आहेत. तेव्हा असा प्रश्न साहजिकच उत्पन्न होतो की शास्त्रीय संशोधनाची यशस्वी वाटचाल करताना कशाला अधिक महत्त्व द्यावे ? शास्त्रज्ञांच्या गुणवत्तेला की त्यांना उपलब्ध असणाऱ्या साधनांना ? आज भारतात चांगल्या दर्जाचे बरेच प्रशिक्षित शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ आहेत. परंतु त्यांच्या कार्याचा राष्ट्रीय विकासावर जितका व जसा परिणाम दिसून यावयास हवा होता तितका दिसून येत नाही. शास्त्रीय संशोधनाच्या अद्ययावत साधनांचे महत्त्व कमी लेखण्याचे कारण नाही. परंतु संशोधनाच्या बाबतीत शास्त्रज्ञांच्या मनोधारणेतील शास्त्रीय जिज्ञासेला अधिक महत्त्व देणे जरूर आहे. सी. व्ही. रामन्, जे. सी. बोस, एम्. एस्. कृष्णन् ह्यांच्यासारख्या विख्यात शास्त्रज्ञांनी जी कामगिरी केली ती करताना त्यांना जुनाट शास्त्रीय उपकरणांचा उपयोग करावा लागला. ह्यांवरून शास्त्रज्ञांच्या मनोवृत्तीतील शोधक प्रेरणेला किती महत्त्व आहे ते लक्षात येते. नव्या पिढीतील शास्त्रज्ञात समस्यांचे ज्ञान आणि त्या सोडविण्याची जिद्द जशी असावयास पाहिजे तशी दिसत नाही. त्याचा परिणाम संशोधनावर होत असावा.

---

**मर्यादित कुटुंबाची अट** — सहकारी गृहनिर्माण संस्थांना सवलतीच्या दरात सहकारी जमीन मिळवावयाची असल्यास या संस्थेच्या सदस्यांनी आपल्या मुलांची मर्यादा तीनपर्यंतच ठेवली पाहिजे आणि ज्यांना सध्याच तीनपेक्षा जास्त मुले आहेत त्यांनी मुलांची सध्याची संख्या कायम ठेवली पाहिजे, असा आदेश महाराष्ट्र सरकारने काढला आहे.

### ग्राहकांच्या सहकारी संघटनांच्या मदतीची जरुरी

सहकारी संघटनांची स्थापना होऊन भारतात ५० वर्षांवर काळ लोटलेला असला तरी त्यांचे कार्य उत्पादन, बँका आणि कांही प्रमाणात वितरण ह्यांच्या पुरतेच मर्यादित राहिले आहे. ग्राहकांच्या सहकारी संघटनांनी भारतात फारसे मूळ कधीच धरले नाही. परदेशात, विशेषतः प्रगत देशांत, अशा संघटना भडकत्या किंमतीना आळा घालण्याचे काम करताना दिसतात. पंतप्रधान इंदिरा गांधी ह्यांनी ह्या बाबींकडे लक्ष वेधले आहे. इंडिअन कोऑपरेटिव्ह कॉंग्रेसचे ६ वे अधिवेशन दिल्ली येथे भरले होते. अधिवेशनाचे उद्घाटन करताना त्या म्हणाल्या की सहकारी संघटनांच्या प्रसाराला कोणतीही मर्यादा असू शकत नाही हे खरे; असे असले तरी समाज जीवनात सहकारावर जितका विश्वास दिसावयास हवा तितका तो दिसत नाही. हे असे का झाले ह्या बाबत काळजीपूर्वक विचार करण्यात आला पाहिजे. आजची सहकारी चळवळही निर्दोष नाही. काही विशिष्ट हित-संबंधांची जपणूक करण्याची वृत्ती ह्या चळवळीत डोके वर काढीत असते. ही प्रवृत्ती मुळातच उत्पन्न होणार नाही अशी दक्षता घेण्यासाठी उपाय शोधून काढण्यात आले पाहिजेत. नाहीतर सहकारी संघटना यशस्वी होण्याच्या मार्गात अडथळे उत्पन्न झाल्याखेरीज राहणार नाहीत. भारताच्या अर्थव्यवस्थेत आज वाढत्या किंमतींचा दाब असह्य झाला असून त्यामुळे चिंता करण्यासारखी परिस्थिती उत्पन्न झाली आहे. म्हणून ग्राहकांच्या सहकारी संघटनांची वाढ करून रोजखपाच्या वस्तूंच्या व्यापारावर प्रभाव पाडला पाहिजे.

---

### सरकारकडे शत्रूभावनेने पाहू नका

फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ह्या संघटनेच्या वार्षिक अधिवेशनाचे उद्घाटन करताना पंतप्रधान इंदिरा गांधी म्हणाल्या की उद्योगधंद्यांतील उत्पादन वाढविण्यासाठी काय उपाय योजावे ह्याविषयी औद्योगिक संघटनांच्या चालकांशी व मजुरांच्या प्रतिनिधींशी सरकार लवकरच वाटाघाटी करणार आहे. किंमती स्थिर राखण्याचे महत्त्व सरकारला पटलेले आहे. परंतु ह्या बाबतीत काही हितसंबंधीयांकडून विरोध होत असल्याने निश्चित स्वरूपाची उपाययोजना करणे अवघड जात आहे. असे उपाय योजण्यापूर्वी उत्पादनाचा खर्च आणि किंमती ह्यांची कसोशीने तपासणी करणे आवश्यक आहे. सरकार आणि उद्योगधंद्यांचे चालक ह्यांच्यात प्रामाणिक मतभेद असू शकतील. अशा मतभेदांना नेहमीच काही प्रमाणात वाव असतो. त्याचप्रमाणे सरकार कधीच चुका करीत नाही असेही मानण्याचे कारण नाही. परिस्थितीचा अंदाज घेण्यात सरकारचाही पाय घसरण्याची शक्यता असते. अशा चुकांपासून शिकण्याचाही प्रयत्न सरकार करू इच्छिते. तथापि उद्योग आणि व्यापाराच्या प्रतिनिधींनी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. सरकार हे काही त्यांचे शत्रू नाही. उलट त्यांच्याशी स्नेहभावाने वागण्याचे धोरण आहे. परंतु त्यांनी आपली स्वतःची भरभराट आणि लोकांचे हित ह्यांची सांगड मात्र घातली पाहिजे. सध्या अर्थव्यवस्थेमधील ८५ टक्के महत्त्वाचा विभाग खाजगी मालकीच्या क्षेत्रात आहे. सार्वजनिक मालकीच्या क्षेत्रात अवघा १५ टक्के विभाग आहे. अशा परिस्थितीत वाढत्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून देण्याची जबाबदारी खाजगी मालकीच्या क्षेत्रावरच पडते.

---

### बुद्धिमंत वर्गाने समाजापासून दुराऊ नये

सागर विद्यापीठाच्या पदवीदानप्रसंगी भाषण करताना शास्त्रीय आणि औद्योगिक संशोधन मंडळाचे प्रमुख डॉ. आत्माराम ह्यांनी बुद्धिमंत वर्गाने बहुजनसमाजापासून फटकून वागू नये असा विचार व्यक्त केला आहे. आपल्या भाषणात ते म्हणाले की, सर्वसामान्य माणूस आणि बुद्धिमंत ह्यांच्यात जो दुरावा दिसून येतो तो खेदजनक आहे. देशापुढे असलेल्या महत्त्वाच्या राष्ट्रीय व सामाजिक प्रश्नांविषयी एक प्रकारची अनास्था सर्वत्र पसरलेली दिसते बुद्धिमंतानी ह्या बाबतीत पुढाकार घेऊन स्पष्टपणे मार्गदर्शन करावयास हवे. पण बुद्धिमंतांनी स्वतःचेच अवमूल्यन करून घेतले आहे, आणि हे करण्यात कधी कधी त्यांनी स्वतःच्या बुद्धीचा कसही कमी करून घेतल्याचे दिसून येते. प्रचलित समाजात ज्यांच्या हाती सत्ता व संपत्ती आहे, त्यांच्या पुढेपुढे करून स्वतःचा स्वार्थ साधण्याच्या खटपटी अनेक बुद्धिमंत करताना दिसतात. एखाद्या सांस्कृतिक प्रतिनिधी मंडळावर जागा मिळण्यासाठी, अगर एखाद्या कमिटीचे सभासदत्व मिळविण्यासाठी त्यांच्या खटपटी चालू असतात. वास्तविक निर्भयपणाने विचार करणे हे त्यांचे काम आहे. ते न करता ते प्रवाहपतिताचे धोरण निष्क्रियपणे अवलंबताना दिसतात. मार्गदर्शन करून पुढाकार घेण्याची जिद्द त्यांच्यात दिसत नाही. ते फक्त कोणाचे तरी अनुयायी बनत आहेत. आर्थिक क्षेत्रातही हीच परिस्थिती आहे. केवळ माहितीचे कोठार बनल्याने कोणतीही व्यक्ती अगर समाज आर्थिक प्रगती करू शकत नाही. आर्थिक विकास साधण्यासाठी उत्पादक कौशल्याची जरूर आहे. म्हणून शिक्षणपद्धतीत उत्पादक कौशल्याच्या प्राप्तीची व्यवस्था असली पाहिजे.

---

**प्रसृत चलनातील वाढ** — भारतातील प्रसृत चलनात १९३९ ते १९७० ह्या काळात १७ पट वाढ झाली; त्याची रकम २५० कोटी रु. वरून ४,२४८ कोटी रु. वर गेली.

**मध्यवर्ती सरकारचे नोकर** — मध्यवर्ती सरकारच्या नोकरीत ३१ मार्च १९६९ रोजी २८,०७,००० नोकर होते. त्यांपैकी ५१·९% रेल्वे खात्यात, १७·९% संरक्षण खात्यात (मुलकी), १३·६% कम्युनिकेशन्स खात्यात आणि ४·४% अर्थ खात्यात होते.

# हिंदी रबर कारखानदारीची झपाट्याने प्रगती

## उज्ज्वल भविष्यकाळाची पावले

शास्त्रीय प्रगती आणि संशोधन ह्यांमुळे रबराचा उपयोग वाढत्या प्रमाणावर करता येणे शक्य झाले आहे. त्यासाठी नवी नवी यंत्रसामग्रीही बनविण्यात आली आणि बनविण्यात येत आहे. साहजिकच, कितीतरी नव्या कारणांसाठी रबराचा आता उपयोग होत आहे. वाहतूक, कारखाने, शेती, इस्पितळे, फर्निचर, ह्याप्रमाणे दैनंदिन गरजाप्रीत्यर्थही रबराचा उपयोग केला जात आहे.

रबर उद्योगाला युद्धोत्तर काळात खूपच गती मिळाली. रबराचे उत्पादन आणि रबराचा वापर ह्या दोन्ही बाबतीत प्रचंड वाढ झाली. नैसर्गिक रबराचा पक्क्या मालासाठी उपयोग केला जातो. १९४८ साली असे १४,२२,५०० लाँग टन रबर खर्ची पडले. १९६८ चा तत्सम आकडा २७,९०,००० लाँग टन एवढा मोठा आहे. कृत्रिम रबराचा खप ह्याच वीस वर्षांच्या काळात ४,८०,००० लाँग टनांवरून ३९,००,००० लाँग टनांवर गेला. अशा तऱ्हेने, दोन्ही प्रकारच्या रबरांचा एकूण खप साडेतीन पटींनी वाढला.

नैसर्गिक रबर, कृत्रिम रबर, आणि रीक्लेम रबर, ह्या तीनही प्रकारच्या रबरांचे उत्पादन करणारे आणि औद्योगिक उपयोग करणारे जगात फक्त दोन देश आहेत—ते म्हणजे भारत आणि ब्राझील.

एकूण आठ देशांत नैसर्गिक रबर तयार होते. त्यात मलेशिया हा देश अग्रेसर आहे. त्यांत १०,९२,३०० लाँग टन रबराची निर्मिती होते. त्या खालोखाल इंडोनेशिया, थायलँड, सिलोन, भारत, इत्यादींचा अनुक्रम लागतो. नैसर्गिक रबराचे उत्पादन मलेशियात आणि इंडोनेशियात होते. ते जागतिक उत्पादनाच्या ७०·५% भरते. भारतातील उत्पादनाच्या प्रमाणाची टक्केवारी २·६% आहे.

कृत्रिम रबर निर्माण करणारे एकूण १९ देश आहेत. त्यात रशिया आणि चीन ह्यांचाही समावेश होतो. अमेरिकेत २१ लक्ष लाँग टन कृत्रिम रबर तयार होते. त्या खालोखाल जपान (३·७४ लक्ष लाँग टन); जर्मनी (२·३४ लक्ष लाँग टन) आणि ग्रेट ब्रिटन (२·३३ लक्ष लाँग टन) असा अनुक्रम आहे. भारतातील उत्पादनाचा आकडा फक्त २२ हजार लाँग टन एवढाच आहे.

सुमारे सहा देश रीक्लेम रबर तयार करतात. त्यांपैकी भारत हाही एक आहे.

सर्व प्रकारच्या रबराच्या खपाच्या दृष्टीने अमेरिका इतर सर्व देशांच्या फारच पुढे आहे. त्यानंतर जपानचा अनुक्रम आहे. जागतिक रबर उद्योग आता रबराच्या वेगवेगळ्या प्रकारच्या ५०,००० जिनसा बनवितो. एकट्या मोटारीमध्ये रबराच्या ४०० जिनसा वापरण्यात येतात.

प्रमुख देशांतील दर माणशी रबराचा खप खालील प्रमाणे आहे. अमेरिका १२·३ किलोग्रॅम, ग्रेटब्रिटन ७·७ किलोग्रॅम, जर्मनी ६·९ किलोग्रॅम, फ्रान्स ६·४ किलोग्रॅम, जपान ५·९ किलोग्रॅम आणि भारत ०·२० किलोग्रॅम.

मोटारींच्या रबरी टायर्सचे उत्पादन देशवार खालील प्रमाणे आहे :— अमेरिका १७१० लक्ष, ग्रेटब्रिटन २२३ लक्ष, जपान ४१० लक्ष, कम्युनिस्ट गट ८४ लक्ष, बाकी सर्व देश १२१३ लक्ष. (त्यांपैकी भारतातील उत्पादन ३४ लक्ष टायर्स.)

भारतातील रबराची कारखानदारी गेल्या ५० वर्षांतीलच आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर, विशेषतः स्वातंत्र्यप्राप्तीनंतर, ह्या कारखानदारीला विशेष चालना मिळाली. हे कारखाने रबराच्या हजारो प्रकारच्या जिनसा बनवितात.

भारतात सध्या सुमारे १,१८० रबर कारखाने आहेत. त्यांपैकी फक्त सुमारे ७० कारखाने रबर डेव्हलपमेंट विंगच्या पटावर आहेत. ह्या १,१०० कारखान्यांपैकी ८०% पेक्षा जास्त कारखाने फारच लहान आहेत. रबर कारखान्यात सुमारे ३८० कोटी रु. चे उत्पादन होते आणि त्यात सुमारे १,००,००० कामगार गुंतलेले आहेत.

भारतात तिन्ही प्रकारचे रबर तयार होत असले, तरीसुद्धा रबराची आयात करणे भाग पडते. कारण, रबराच्या उठावाच्या मानाने रबराची निर्मिती वाढत गेलेली नाही. ही परिस्थिती काही काळ अशीच राहणार आहे.

भारतातील रबर उद्योग पश्चिम बंगाल, मद्रास आणि महाराष्ट्र ह्यांत केंद्रित आहे. ह्या तीन राज्यांत मिळून भारतातील ८१% नव्या रबराचा उठाव होतो. त्या तिघांतील प. बंगालचा वाटा ४०%, मद्रासचा २१·% आणि महाराष्ट्राचा २०% आहे. हरिआणा, केरळ, दिल्ली, म्हैसूर, इत्यादींचे अनुक्रम खाली आहेत.

भारताला लागणाऱ्या रबरी मालापैकी बहुतेक सर्व प्रकारच्या मालाचे उत्पादन भारतात होते. इतकेच नव्हे तर रबराचे कारखाने निर्यात करून परदेशी हुंडणावळही मिळवू लागले आहेत.

रबराच्या कारखान्यांत वापरण्यात येणाऱ्या एकूण रबरापैकी १२% रबर पादत्राणांच्या उत्पादनात वापरले जाते. पादत्राणांचे उत्पादन करणारे सुमारे २०/२५ मोठे कारखाने आहेत. छोटे कारखाने मुख्यतः पंजाब आणि हरियाणा येथे आहेत.

भारताची मोठी लोकसंख्या आणि राहणीच्या मानातील सुधारणेमुळे पादत्राणे वापरण्याची वाढती प्रवृत्ती, ह्याकारणाने रबरी पादत्राणांचे कारखाने झपाट्याने पुढे येत आहेत. पादत्राणांच्या खपाला खूपच मोठा वाव आहे. अमेरिकेत दर माणशी खप ४ पादत्राण जोड्यांचा आहे. जपानमध्ये २·७, ग्रेट ब्रिटनमध्ये २·२, आणि भारतात फक्त ०·४६ जोड्या असा आहे. खालील तक्त्यात पादत्राणांचे उत्पादन आणि उत्पादनांचा अंदाज ह्याविषयी आकडे दिले आहेत.


**पादत्राणांचे भारतामधील उत्पादन व उत्पादनाचा अंदाज**

| वर्ष | लक्ष जोड्या |
|---|---|
| १९५५ | ३४९ |
| १९६० | ४४६ |
| १९६५ | ५३० |
| १९६७ | ५४५ |
| १९६८–६९ (अंदाज) | ६०० |
| १९७१–७२ (अंदाज) | ७७० |
| १९७३–७४ (अंदाज) | ९०० |

रबरी जिनसांसाठी परदेशावर अवलंबून असणारा भारत आता निर्यात करू लागला आहे. मोटारींच्या टायर–ट्यूब्ज, सायकलींच्या टायर–ट्यूब्ज, रबर व कॅनव्हस शूज, हायजिनिक–सर्जिकल–मेडिकल रबरी जिनसा, बेल्टिंग्ज, होजेस, इत्यादींचा निर्यातीत मुख्यतः समावेश आहे. मध्यपूर्व, आफ्रिकन आणि आग्नेय आशिआतील देश, काही युरोपीय देश आणि थोड्या प्रमाणावर अमेरिकाही भारताचे ग्राहक आहेत.

**काही महत्त्वाच्या रबरी जिनसांची निर्यात**
**(आकडे लक्ष रुपयांचे)**

| | १९६१–६२ | १९६५–६६ | १९६८–६९ |
|---|---|---|---|
| १ मोटारींच्या टायर-ट्यूब्ज | ११·८ | २७४·८ | ३२७·६३ |
| २ सायकलींच्या टायर-ट्यूब्ज | २४·६ | २३·१ | ७६·१८ |
| ३ हायजिनिक–मेडिकल-सर्जिकल जिनसा | ०·४ | २·१ | ६३·३७ |
| ४ रबरी व कॅनव्हस पादत्राणे | ८०·४ | १४७·७ | २०६·७२ |
| ५ बेल्टिंग्ज, होजेस इ. | ३४·१ | ५१·२ | ५३·९५ |
| | १५१·३ | ४९८·९ | ७२७·८५ |




THE BELGAUM BANK LIMITED

Estd. 1930

SCHEDULED BANK

*Regd. Office* : 659–60, Raviwar Peth, Belgaum

Working Funds : Over Rs. 7 Crores
Share Capital &
Reserves : Over Rs. 17 Lacs

40 Branches in the States of Mysore & Maharashtra & Goa Territory – Major Number of Branches in Rural Areas – Facility of Safe Deposit Lokers at Belgaum, Gokak and Nipani Branches in Mysore State.

S. Y. KAMAT
*General Manager.*

K. B. KIRTIKAR
*Chairman.*

## स्वस्तिकचे श्री. वसंतराव वैद्य ह्यांचा परदेश दौरा



स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि. चे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. वसंतराव वैद्य, हे ४० दिवसांच्या परदेशच्या दौऱ्यासाठी १६ एप्रिल १९७१ रोजी मुंबईहून रवाना झाले. युरोप, कॅनडा, ग्रेटब्रिटन आणि काही प्रमुख युरोपीय देशांना ते भेटी देणार आहेत. पादत्राणे प्रभृती रबरी मालाच्या निर्गतीच्या वाढीस गती घडवून आणणे आणि त्याबरोबरच परदेशातील रबर टेक्नॉलॉजीच्या क्षेत्रातील अद्ययावत प्रगतीशी संपर्क ठेवणे, हा त्यांच्या दौऱ्याचा प्रधान हेतू आहे. परदेशातील बाजारपेठांत स्वस्तिकच्या उत्पादनांनी लौकिक मिळविलेला आहे आणि त्यामुळे परदेशी बाजारपेठांची आणखी वाढ करण्यास स्वस्तिकला खूपच अनुकूलता आहे. कंपनीच्या विकासाच्या आणि निर्गतीच्या वाढीच्या दृष्टीने श्री. वसंतराव वैद्यांचे ह्यापूर्वीचे दौरे अत्यंत फलदायी झालेले आहेत.

श्री. वैद्य २४ मे, १९७१ रोजी मायदेशी परत येतील.

---

### आयुर्विम्याच्या रकमेत वाढ; पॉलिसींत घट

लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनने १९६९–७० मध्ये १०३६ कोटी रुपयांचे काम पुरे केले. १९६८–६९ मध्ये ९२९ कोटी रु. चे काम झाले होते.

विम्याची रक्कम वाढली तरी विमा पॉलिसींची संख्या कमी झाली. १९६८–६९ मध्ये १४·५४ लक्ष विमा पॉलिसी देण्यात आल्या; १९६९–७० मध्ये त्यात ५३ हजारांची घट झाली.

१९६९–७० मध्ये प्रत्येक पॉलिसी सरासरीने ७,३९४ रु. ची होती; १९६८–६९ मध्ये ती ६,३९० रु. ची होती.

ह्याचा अर्थ, कमी लोकांनी पण जास्त रकमांचे विमे उतरले. पहिल्याप्रथमच विमा उतरणारांना दिलेल्या पॉलिसींची संख्या १९६९–७० मध्ये ९·१२ लक्ष होती व त्यांनी ५८४ कोटी रु. चे विमे उतरले होते. १९६८–६९ चे तत्सम आकडे ९·९३ लक्ष पॉलिसी व ५४८ कोटी रु. असे होते.

ग्रामीण भागातील विम्याचे काम वाढत आहे. १९६९–७० मध्ये देण्यात आलेल्या पॉलिसींपैकी ३३% म्हणजे ४·६१ लक्ष पॉलिसी ग्रामीण भागातील विमेदारांना देण्यात आल्या. त्यांच्या विम्याची रक्कम २५१·७६ कोटी रु. होती.

जेथे बँकिंगच्या सोई पुरेशा उपलब्ध नाहीत, तेथे हप्त्यांचा भरणा पोस्ट ऑफिसांमार्फत करण्याच्या व्यवस्थेस प्रतिसाद चांगला मिळाला आहे. ह्या प्रकारे १·२३ कोटी रु. चे हप्ते वसूल झाले.

क्लेम्सची रक्कम सत्वर देण्याच्या प्रयत्नामुळे क्लेमच्या बाकी रकमेचे कळविलेल्या क्लेम्सशी पडणारे प्रमाण ३४·८% वरून २९·८% वर उतरले आहे.

खर्चाचे प्रमाण मात्र वाढत चालले आहे. १९६७–६८ मध्ये ते २७·५२%, १९६८–६९ मध्ये २७·५४% आणि १९६९–७० मध्ये २७·६९% झाले.

---

### लोकसभेच्या निवडणुकीत ६१·१% उमेदवारांचे डिपॉझिट जप्त

१९७१ मधील लोकसभेच्या निवडणुकीस ५१७ जागांसाठी २,७७९ उमेदवार उभे होते; १९६७ मधील निवडणुकीस २,३६४ उमेदवार उभे होते. म्हणजे, उमेदवारांची संख्या ४१५ नी वाढली.

१९६२ सालच्या निवडणुकीत एकूण उमेदवारांपैकी ४३·७% उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले. १९६७ च्या निवडणुकीस प्रमाण ५०·९% झाले आणि गेल्या निवडणुकीत ते ६१·१% झाले.

एस. एस. पी., बी. के. डी., पी. एस. पी., इत्यादी पक्षांच्या उमेदवारांपैकी ६५% उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले. सिंडिकेट आणि जनसंघ ह्यांचे बाबतीत हे प्रमाण अनुक्रमे ४७·५% आणि २८·१% होते. सी. पी. एम्. आणि सी. पी. आय. पक्षांचे बाबतीत ते अनुक्रमे ३६·९% आणि ३६·८ होते. इंदिरावादी काँग्रेसच्या ५११ उमेदवारांपैकी ७ उमेदवारांचे (१·४%) डिपॉझिट जप्त झाले.

खालील तक्त्यात निवडणुकीस उभे राहिलेले उमेदवार, निवडून आलेले उमेदवार आणि डिपॉझिट जप्त झालेले उमेदवार ह्यांचा पक्षवार तपशील दिला आहे.

| पक्ष | उमेदवार संख्या | निवडून आलेले उमेदवार | डिपॉझिट जप्त झालेले उमेदवार |
|---|---|---|---|
| इं. काँग्रेस | ४४१ | ३५० | ५ |
| सिं. काँग्रेस | २३८ | १६ | १४३ |
| जनसंघ | १५७ | २२ | ४५ |
| स्वतंत्र | ५९ | ८ | १८ |
| एस. एस. पी. | ९३ | ३ | ६२ |
| पी. एस. पी. | ६२ | २ | ५१ |
| सी. पी. आय. | ८७ | २३ | ३२ |
| सी. पी. एम. | ८४ | २५ | ३१ |
| बी. के. डी. | १०१ | १ | ७२ |
| इतर मान्य पक्ष | ९८ | ३७ | ३४ |
| मान्य न केलेले पक्ष | ३२३ | १७ | ५२९ |
| अपक्ष | १०३६ | ११ | ९७६ |
| | २,७७९ | ५१५ | १,७०० |

## लोकसंख्येच्या वाढीचा वेग अजूनही चिंताजनक

१९७१ मध्ये भारताची लोकसंख्या जितकी होईल असे वाटत होते त्यापेक्षा सुमारे १·४० कोटींनी ती कमी भरली आहे. मूळचा अंदाज सुमारे ५६ कोटींचा होता. तथापि लोकसंख्येच्या वाढीची समस्या सुटण्याच्या मार्गावर आहे असा त्याचा अर्थ नाही. जननाच्या वाढत्या प्रमाणाने उत्पन्न झालेली व होत असलेली चिंताजनक परिस्थिती बदललेली नाही. १९६१ मधील शिरगणतीशी तुलना करता त्यानंतरच्या १० वर्षांत लोकसंख्येची वाढ २४·५ टक्क्यांनी झालेली आहे. दशवार्षिक वाढीचा हा वेग खूपच मोठा आहे. लोकसंख्येच्या वाढीकडे निराळ्या दृष्टिकोनातून पाहिले तर काय दिसते ? गेल्या १० वर्षांत भारताच्या लोकसंख्येत जपानच्या एकूण लोकसंख्येपेक्षाही अधिक भर पडलेली आहे. भारताची आजची लोकसंख्या रशिया, अमेरिका आणि जपान ह्या सर्व देशांच्या लोकसंख्येच्या बेरजे इतकी जवळजवळ झालेली आहे. ह्यावरून तिच्या वाढीच्या प्रत्यक्ष परिणामाची कल्पना येण्यासारखी आहे. कुटुंबनियोजनाचा कार्यक्रम ज्या मानाने यशस्वी होईल असे वाटत होते त्या मानाने तो झालेला नाही असाच ह्याचा अर्थ आहे. अर्थात, जननाचे प्रमाण व मृत्यूचे प्रमाण ह्यांचा अधिक तपशीलवार अभ्यास झाल्याशिवाय कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमाचे बिनचूक मूल्यमापन करता येणार नाही. दरम्यान, लोकसंख्येच्या वाढत्या दाबामुळे आर्थिक प्रगतीची फळे सामान्य लोकांपर्यंत पोचणे अवघड होत आहे. तात्पर्य, शिरगणतीच्या नव्या आकड्यांनी लोकसंख्येच्या कूट प्रश्नाचे गांभीर्य अधिकच स्पष्ट केले आहे. परिणामकारी उपायांच्या दृष्टीने हेही स्वागतार्हच म्हणावे लागेल.

---

## उद्योगधंद्याला सरकारी मदत हवी असणारांनी कुटुंबनियोजन केले पाहिजे

उद्योगधंदे करणारांना महाराष्ट्र सरकारची मदत हवी असेल, तर त्यांनी स्वतःचे कुटुंब तीन अपत्यापुरते किंवा विद्यमान आकाराइतके मर्यादित ठेवण्याची हमी दिली पाहिजे. राज्य सरकारने त्याप्रमाणे स्टेट एड टु इंडस्ट्रीज नियमात दुरुस्ती केली आहे. कुटुंबात पत्नी, त्याची औरस मुले, सावत्र मुले, त्यावर अवलंबून असणारे आणि त्याच्या जवळ राहणारे दत्तक मूल, ह्यांचा समावेश होतो. विधवा किंवा विधुर ह्यांनी पुनर्विवाह केला तर तिची किंवा त्याची मुले त्यांच्या जवळ राहात असतील व त्यांच्यावर अवलंबून असतील, तर तीही कुटुंबात धरली जातील.

---

**लिज्जत पापड** — १९७० मध्ये लिज्जत पापडांची विक्री ४० लक्ष रु. ची झाली. ७ लक्ष रु. चे पापड निर्गत झाले. ह्या गृहोद्योगात १,००० स्त्रियांना काम मिळते. ११० कर्मचारी आहेत.

## जयंती धर्मा तेजावरील आरोप

जयंती धर्मा तेजाला भारतात आणण्यासाठी सरकारने अमेरिका, कोस्टारिका आणि ग्रेट ब्रिटनमध्ये कोर्टात ५ वर्षे कारवाई करून अखेर त्याला दिल्ली येथील मॅजिस्ट्रेटपुढे उभे करून ३० एप्रिल पर्यंत ज्युडिशिअल कस्टडीत ठेवण्याचा हुकूम मिळविला. तेजा जामिनाचा अर्ज करून शकेल. तेजाचे वय ४८ वर्षांचे आहे. त्याचेवर चार प्रमुख आरोप आहेत.

(१) स्वतःची पत्नी सौ. रणजित कौर तेजा हिच्याशी संगनमत करून डायरेक्टर बोर्डाच्या ठरावात खाडाखोड करून कंपनीच्या नावे असलेले १९ लक्ष रु. चे लेटर ऑफ क्रेडिट स्वतःच्या नावे केले.

(२) स्टेट बँक ऑफ इंडियाच्या लंडन येथील शाखेमध्ये त्याच्या पत्नीचे खाते होते, त्यातून त्याने बनवाबनवी करून, खोटे कागदपत्र करून, ८६ लक्ष रु. उचलले.

(३) एका नॉर्वेजिअन कंपनीने जयंती शिपिंग कंपनीची आगबोट चार्टर केली होती. त्यासाठी नॉर्वेजिअन कंपनीने दिलेल्या रकमेपेक्षा कमी रक्कम दिली असे जयंती शिपिंग कंपनीला खोटेच लिहून देऊन ६·५७ लक्ष रुपये गिळंकृत केले.

(४) एका जपानी कंपनीला जयंती शिपिंग कंपनीसाठी ११ आगबोटी बांधण्याचे कंत्राट देऊन स्वतः २% कमिशन घेतले.

---

## श्री. गंगाधरपंत कुचन यांचा सत्कार

महाराष्ट्र राज्य सहकारी सूत गिरणी महामंडळावर अध्यक्ष व महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कौन्सिलवर सदस्य म्हणून श्रीयुत **गंगाधरपंत सिद्रामप्पा कुचन** यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार सोमवार दिनांक १९-४-१९७१ रोजी सायंकाळी ७ वाजता महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष पद्मश्री **वसंतदादा पाटील** यांचे अध्यक्षतेखाली सोलापूर जिल्हा औद्योगिक सहकारी बँकेच्या 'वैकुंठभाई मेहता' सभागृहात करण्यात आला.

---

**पदकांवर नावे कोरणार** — म्यूनिच येथे १९७२ मध्ये ऑलिंपिक सामने होतील, तेव्हा ३६४ सुवर्णपदके, ३६४ रौप्यपदके आणि ३८१ ब्रॉंझपदके दिली जातील. ही पदके समारंभपूर्वक देण्याचे वेळी त्यांवर विजेत्यांची नावे कोरलेली असतील.

**शिक्षकांना चेकने पगार** — खाजगी, सरकारी मदत घेणाऱ्या शाळांतील शिक्षक आणि बिगर-शिक्षक नोकरांना चेकने पगार देण्याचा प्रयोग प्रथम मुंबई उपनगर, ठाणे, नागपूर, औरंगाबाद आणि पुणे ह्या पाच जिल्ह्यांत केला जाणार आहे. जिल्हा सहकारी बँक, तिच्या शाखा किंवा राष्ट्रीयीकृत बँकेच्या शाखा, ह्यांवर काढलेले ते चेक असतील.

### घरकामे नौकर अजूनही उपेक्षित

मुंबई-पुण्यासारख्या शहरी कुटुंबांत काम करणाऱ्या घरकाम्या नौकराने रजा मागितली अगर तो काम सोडून जाऊ लागला तर गृहिणी अगदी बेचैन होऊन जाते. नवा नौकर मिळणे अवघड जाते. दरम्यान गृहिणीलाच त्याची कामे करावी लागतात. पण संघटित मजुरांप्रमाणे ह्या नौकरवर्गाला सवलती मात्र मिळत नाहीत. त्याच्याकडे अजून कोणाचे फारसे लक्षच गेलेले नाही, असा निष्कर्ष आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेने काढला आहे. घरकाम करणाऱ्या नौकरवर्गाविषयी संघटनेने सर्व देशांकडे माहिती मागविली होती. सुमारे ६५ देशांनी माहिती पाठविली. त्यावरून असे दिसून येते की घरकाम करणाऱ्या नौकरांना सर्वांत कमी मेहनताना मिळतो, काम फार सांगितले जाते आणि त्यांच्या प्रश्नांकडे उपेक्षेने पाहण्यात येते. जगात ज्या भागांत मनुष्य-बळाचा तुटवडा आहे तेवढा भाग सोडला तर इतर ठिकाणी त्यांना कोणत्याही प्रकारचे कायद्याचे अगर सामाजिक संरक्षण नाही. मनुष्यबळाचा तुटवडा आहे अशा ठिकाणी मात्र ते काही प्रमाणात अटी घालून स्वतःच्या परिस्थितीत सुधारणा करून घेतात. पूर्व युरोपातील समाजवादी देशांत घरकामे करणाऱ्या नौकरांच्या पद्धतीला उत्तेजन दिले जात नाही. तेथे आपली कामे स्वतःच करण्यावर भर देण्यात येतो. पश्चिम युरोप आणि उत्तर अमेरिका ह्या भागात घरकाम करणाऱ्या नौकरांची संख्या घटत चालली आहे. ह्या देशातून यांत्रिक उपकरणे वापरण्याची पद्धत एकसारखी वाढत चाललेली आहे.

---

### पुरुषांच्या कौटुंबिक वर्चस्वाला ओहोटी

युनेस्कोच्या ताज्या नियतकालिकांत शास्त्रांचा समाज जीवनावर होणाऱ्या परिणामाबद्दल समाजशास्त्रज्ञांच्या मताचे हवाले देण्यात आले आहेत. ह्या मताप्रमाणे निदान अमेरिकेत तरी कौटुंबिक जीवनातील पुरुषांचे महत्वाचे स्थान ढळले असल्याचे दिसून येते. त्यांपैकी एक समाजशास्त्रज्ञ म्हणतो की पुरुष आपल्या कुटुंबात राजासारखा गणला जाण्याचे दिवस भूतकाळात जमा झाले आहेत. घरात राजाप्रमाणे वावरणारा पुरुष आता दरबारातील विदूषक अगर खुषमस्कऱ्या ही भूमिका पार पाडीत आहे. रोज बदलत जाणाऱ्या जगात पुरुषांचे स्थानही चळले आहे आणि समाजजीवनाच्या उत्क्रांतीत तो सापडला आहे. एक तर कुटुंबाचा एकमेव पोशिंदा म्हणून आता त्याला स्थान नाही. स्त्रियाही कुटुंब पोषणाची जबाबदारी त्याच्या इतक्याच कार्यक्षमतेने व तत्परतेने पार पाडीत आहेत. शिवाय पुरुषांच्या वर्चस्वाच्या जोखडाखालून निघून स्वतंत्र बाण्याने जगण्याची स्त्रियांची चळवळ वाढत चालली आहे. पुरुषप्रधान कौटुंबिक व्यवस्था सध्याच्या समाजात व्यवहार्य राहिलेली तर नाहीच, पण अशा व्यवस्थेचे कार्यही समाधानकारक होताना दिसत नाही.

---


**सरदारगृह**

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमची वैशिष्ट्ये —


* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक


फोन नं. :- ३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार—सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.








इंजिन असो अगर इलेक्ट्रिक मोटार असो त्यांस "विजय" पंपाची आवश्यकता आहेच. विजय पंप विनातक्रार अखंड पाणीपुरवठा करतात.

कारखानदार—

**न्यू विजय इंडस्ट्रीज लि.**

विश्रामबाग—सांगली ( महाराष्ट्र )

फोन : २३२ तार : Vijayplow



किर्लोस्कर®

डीज़ल एंजिन
की प्रसिद्धि के कारण
■ गुणवत्ता ■ टिकाऊपन
■ विश्वसनीयता तथा
■ किसानों की समृद्धि

उत्कृष्ट डीज़ल एंजिन के निर्माता
किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड, पूना-३ (भारत)

Tom & Bay/KO-7043 HIN

" ® Registered User-Kirloskar Oil Engines Ltd., Poona-3"


हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. ( वार्षिक वर्गणी रु. ६ )